## महाराष्ट्र शासन

## इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई

## कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), महाराष्ट्र राज्य, नागपूर

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – 440 022**

**Website : www.vanarti.in CIN : U84120MH2026NPL466492 Email : vanarti.info@gmail.com**

जा.क्र. वनार्टी/नागपूर/आस्था/494/2026-27 दि.18/06/2026

### -: योजनेचा तपशील :-

**वनार्टी मार्फत "केंद्रीय लोकसेवा आयोग (नागरी सेवा)" पूर्व परीक्षा – 2026 उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेकरिता आर्थिकसहाय्य योजनेचा तपशील**

महाराष्ट्र राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रर्वगातील जे विद्यार्थी **"केंद्रीय लोकसेवा आयोग (नागरी सेवा)" पूर्व परीक्षा - 2026** (दि. 15/06/2026 रोजी UPSC ने जाहीर केलेल्या निकालाप्रमाणे) उत्तीर्ण झालेले आहेत अशा विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेकरिता एकरकमी आर्थिक सहाय्य प्रदान करण्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

**योजनेच्या लाभासाठी पात्रता :**

1. विद्यार्थी महाराष्ट्रातील रहिवासी असावा.
2. विद्यार्थी हा नॉन- क्रिमिलेअर गटातील विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील असावा/असावी.
3. विद्यार्थी हा **"केंद्रीय लोकसेवा आयोग (नागरी सेवा)" पूर्व परीक्षा - 2026** (दि. 15/06/2026 रोजी UPSC ने जाहीर केलेल्या निकालाप्रमाणे) उत्तीर्ण झालेला असावा. ज्या विद्यार्थ्यांना सदर परीक्षेकरिता महाज्योती संस्थेमार्फत अर्थसहाय्य मिळत असल्यास अश्या विद्यार्थ्यांना सदर योजनेच्या लाभासाठी ग्राह्य धरल्या जाणार नाही.

**अर्ज करण्यासाठी आवश्यक वैयक्तिक कागदपत्रे :**

1. आधार कार्ड (पुढील व मागील बाजुसहित)
2. जातीचा प्रमाणपत्र (Caste Certificate)
3. वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate)
4. "केंद्रीय लोकसेवा आयोग (नागरी सेवा)" पूर्व परीक्षा – 2026 चा प्रवेश पत्र
5. "केंद्रीय लोकसेवा आयोग (नागरी सेवा)" पूर्व परीक्षा – 2026 उत्तीर्ण झालेल्या निकालाची प्रत (बैठक क्रमांक ठळक करुन देण्यात यावे.)

**अर्ज कसा करावा .**

1. वनार्टी www.vanartri.in या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील **"Application Invited For Financial Assistance to Those Who Have Qualified For UPSC Mains – 2026" (Civil Services)** यावर जाऊन ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावा.
2. अर्जासोबत वरील नमूद कागदपत्रे स्वाक्षांकीत करुन स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन अपलोड करावे.

**अटी व शर्ती :**

1. अर्ज करण्याची अंतिम दि. 30/06/2026 आहे.
2. पोस्टाने किंवा ई-मेल द्वारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.
3. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज नाकारणे व स्विकारणे याबाबतचे सर्व अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, वनार्टी यांचे राहतील.
4. कोणत्याही माध्यमातून व अंतिम निवड प्रक्रियेच्या टप्प्यावर विद्यार्थ्यांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण किंवा दिशाभूल करणारी असल्याचे आढळल्यास तो/ती विद्यार्थी कायदेशीर कारवाईस पात्र राहिल.
5. विद्यार्थ्यांचे बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न असणे आवश्यक आहे.
6. अर्ज भरतांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास केवळ वनार्टी Call Centre वर पुढील क्रमांकावर संपर्क करावा. +91 788 788 2026

**स्वा**
**(प्रशांत वावगे)**
व्यवस्थापकीय संचालक
वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था,
(वनार्टी) महाराष्ट्र राज्य, नागपूर